**TEST-1** | Code : KICK
**प्रश्नपुस्तिका** | Sr. No. 1234
**सामान्य क्षमता चाचणी** | **एकुण प्रश्न** : 80
**वेळ :** 2 (दोन) तास | **(पेपर - II)** | **एकुण गुण** : 200

---

# सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 80 प्रश्न अनिवार्य आहेत. उमेदवारांनी उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परिक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत न विसरता बॉलपेनने लिहावा.

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सुचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1,2,3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सुचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमुद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायाकिंत करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. ह्याकरिता फक्त काळया शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नाची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने सोडविणे श्रेयस्कर आहे पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालवता नंतर त्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एखादे नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) प्रस्तुत परिक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील तसेच उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील.

KARVY'S INSTITUTE FOR COMPETITIVE KNOWLEDGE
Plot No. 20, 'Vatsala' Vanrai Nagar, Manewada, Nagpur-34
KICK ..Just for your goals

**स्पर्धेच्या युगामध्ये स्पर्धकास योध्दाच व्हावे लागते. योध्दा तोच जो आहे त्या परिस्थितीमध्ये झुंज देतो केवळ आपल्या ध्येयपुर्तीसाठी !**
**आपणही नक्कीच योध्दा असाल यात काही शंका नाही ....**
**मग घ्या शस्त्रे हातात ज्ञानार्जणाची, मेहनतीची, चिकाटीची, प्रामाणीकतेची आणि जिंका हे युध्द स्पर्धेचे !**

*All the Best...*



KARVY'S INSTITUTE

**परिच्छेद 1**

जवळ जवळ सर्वच धर्मांनी स्त्रीला दुय्यम स्थाने दिलेले आहे. इस्लामने तीन वेळा तलाक उच्चारून विवाहित स्त्रीला काडीमोड देण्याची सोय ठेवली आहे. इतकेच नाही तर त्या स्त्रीला पोटगीचा अधिकार देखील नाकारला आहे. यहुदी धर्माची आज्ञा अशी सांगते, की 'जेवताना भाकरी करपली तर पत्नीला सोडचिठ्ठी द्यावी'. हिंदू धर्मातील मनुस्मृती मध्ये असे लिहिले आहे, की पती व्यसनी, जुगारी, वेश्यागमनी कसाही असला, तरी स्त्रीने त्याच्या आज्ञेत राहावे. ख्रिश्चन धर्माच्या मते पुरूषाच्या जन्मानंतर केवळ त्याच्याचसाठी स्त्रीची निर्मिती झाली आणि ती देखील पुरूषाच्या बरगडीपासून इतकेच नाही, तर असे देखील म्हटले आहे, की ज्ञानाचे फळ खाण्याचा मोह निर्माण करून स्त्रीनेच आद्य पाप घडवले आणि त्यामधून जगाचा सारा वेदनादायी इतिहास सुरू झाला. बौध्द धर्मामध्ये स्त्रियांना प्रवेश देण्याचा निर्णय आपला पट्टशिष्य आनंद ह्याच्या सांगण्यावरून घेताना बुध्द असे म्हणाले, 'स्त्रियांना धर्मात प्रवेश दिल्यामुळे हजार वर्षे टिकणारा माझा धर्म आता पाचशे वर्षेच टिकेल'. ह्या सर्व गोष्टी स्वयंमस्पष्टरीत्या स्त्री-पुरूष भेदभावाचे समर्थन करणा-या आहेत.

हा गुंता सोडवायचा असेल, तर हे मान्य करण्यावाचून गत्यंतरच नाही, की आपण जन्माने कुठल्याही धर्माचे असलो तरी आपल्या धर्मामध्ये जे कालबाह्य झाले आहे ते आपण चिकित्सा करून अयोग्य ठरल्यास मागे टाकले पाहिजे. पण जागतिक पातळीवर भारतासकट अनेक ठिकाणी धर्माचे कट्टरीकरण होत असताना आणि विधायक कृतीशील धर्मचिकीत्सेचा आग्रह धरणा-या लोकांचे गोळया घालून खुन होत असताना हे घडावे कसे ? धारणा आणि मूल्ये आधुनिक करायची असतील, तर आपल्याला ती आधी तपासून बघायला हवीत आणि धर्म हा जर आपल्या आयुष्यातील सर्वात मोठी धारणा असेल तर ती तपासून पाहायला हवी की नाही? पण असा विधायक धर्म चिकीत्सेचा आग्रह जर कोणी धरू लागले, तर 'तुम्हाला आमच्याच धर्मातील त्रुटी दिसतात' असे म्हणून त्यांचाशी भांडतो. ह्यातून आपल्या स्वत:च्या धारणा आणि मूल्ये ही आधुनिक होण्याच्या मार्गात आपण स्वत:च अडथळा बनत असतो हे आपल्या लक्षात देखील येत नाही. ख-या धर्माला चिकित्सेचे वावडे असण्याचे काही करणच नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायम ह्या बाबतीत ख-या सोन्याला आगीचे भय नसते' हे उदाहरण द्यायचे.

आपण जर योग्य मूल्यांचा आग्रह धरून उभे राहिलो, तर कदाचित थोडा वेळ लागेल, काही किंमत मोजावी लागेल, पण समाजाची धारणा करणारे प्रमाणमूल्य बदलू लागते. आंदोलनाच्या अनुषंगाने समाजात घुसळण झाली. अजून बरीच मजल आपल्याला गाठायची आहे. त्यासाठी आपल्याला धर्माच्या नावावर चालणारी स्त्री-पुरूष असमानता आणि भारतीय राज्यघटनेने दिलेले स्त्री-पुरूष समानतेचे मूल्य ह्यांच्या लढाईत आपण कोणत्या बाजूने उभे राहणार हे ठरवायला हवे. धर्मातील चुकीच्या गोष्टी गळून पडल्याने धर्म धोक्यात येत नाही, तर उन्नत होतो ही धारणा मनामध्ये घेवून चांगल्या बदलला पाठिंबा देण्याची निर्भय भूमिका आपण घेतली, तर केवळ मंदिरांच्या

KARVY'S INSTITUTE

ठिकाणी महिलांना प्रवेशच नाही, तर धर्माच्या नावावर होणारी विविध प्रकारची स्त्री-पुरूष असमानता आपण नष्ट करू शकू.

**1. परिच्छेदाच्या अनुषंगाने खालीलपैकी अचुक विधाने निवडा.**

(a) धर्म हा स्त्रिविरोधक आहे तसेच स्त्री-पुरूष विषमता निर्माण करणारा आहे.

(b) कट्टरतावाद धर्माला जनमानसात रूजू देत नाही.

(c) धर्म समाजात विनाशक आहे.

(1) केवळ a (2) केवळ a व b (3) केवळ c (4) वरील सर्व

---

**2. खालील विधाने लक्षात घ्या.**

(a) जगातील जवळ जवळ सर्वच धर्म स्त्रीला दुय्यम स्थान देतात.

(b) स्त्री, धर्मामुळे दुबळी झाली आहे.

**परिच्छेदाच्या अनुषंगाने योग्य पर्यायी उत्तरे शोधा.**

(1) केवळ विधान a अचुक आहे.

(2) केवळ विधान b अचुक आहे.

(3) दोन्ही विधाने अचुक आहेत आणि विधान b हे विधान a चे कारण आहे.

(4) दोन्ही विधाने चुक आहेत.

---

**3. लेखक व्यक्तींनी कसे असावे असे सुचवितो ?**

(1) नेहमी धर्मातील चालीरीतीचे आदराणे पालन करणारा.

(2) धर्म विषमतावादी असल्यामुळे त्यास झुगारून द्यावे.

(3) धर्मसुधारणा करण्यावर भर देऊन आधुनिक मुल्ये जोपासावी.

(4) आधुनिक विचारांच्या आधारावर नव धर्मनिर्मिती करावी.

---

**4. परिच्छेदाच्या माध्यमातून लेखकास काय सांगावयाचे आहे ?**

(1) पुरोगामी विचारांची कास धरून समतावादी समाज घडविण्याची गरज आहे.

(2) जगातील जवळ सर्वच धर्म विषमतावादी असल्याने आधूनिक धर्मस्थापनेची नितांत आवश्यकता आहे.

(3) समाजसुधारणा ही एक निरंतर प्रक्रीया असल्याने पुरातन विषमतावादी धर्म आपोआप लयास जातील

(4) धर्मचिकित्सा करून चुकीच्या धर्मांचा नयनाट केला पाहिजे.

---

KARVY'S INSTITUTE

**परिच्छेद 2**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत विविध महत्वाच्या सरकारी पदांवर निवड झालेल्या ४३७ उमेदवारापैकी २५ उमेदवारांनी आदिवासी असल्याची बनावट प्रमाणपत्रे दिल्याचा प्रकार उघड झाला आहे. महाराष्ट्रात तब्बल एक लाखाच्या आसपास बोगस आदिवासी प्रमाणपत्रे असलेले कर्मचारी विविध सरकारी, निमसरकारी आस्थापनांमध्ये कार्यरत आहेत, असे विधिमंडळात मागील सरकारमधील मंत्र्यांनीच कबूल केले होते. महाराष्ट्रात ४७ आदिवासी जमाती शेती अथवा तत्सम छोटया मोठया उपजीविकेच्या साधनांवरच आपला उदरनिर्वाह करतात. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेत यातील काही तरूण नोकरीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करतात. मात्र, बहुधा त्यांच्या पदरी निराशाच येते. जातिप्रथेमुळे मागास राहिलेल्या घटकांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राखीव जागांचा घटनेत अधिकार दिला. मात्र, राखीव जागांकडे पाहण्याचा समाजातील उच्चवर्णीय वर्गाचा दृष्टिकोन हा कायम हेटाळणीयुक्त राहिला. दिवसभर काबाडकष्ट करून दिवाबत्तीची सोय नसताना आदिवासी मुला-मुलींनी अभ्यास करून स्पर्धेत उतरावे व सरकारने त्यांच्यासाठी ठेवलेल्या नोक-या कराव्यात हे दिवास्वप्न आहे. त्यांच्या शैक्षणिक, आर्थिक उन्नतीसाठी सरकार तसेच समाजातील आहे रे वर्गाने स्वत:हून पुढे येऊन मदत करणे अपेक्षित आहे. मात्र, एकीकडे सरकारी पातळीवर याबाबत कायम अनास्था दिसते. एमपीएससी, यूपीएसएसी, आयआयटी, आयआयएम या भारतातील अत्युच्च पातळीवरील स्पर्धा परीक्षांसाठी लागणारी तयारी आदिवासी मुलांना करता यावी म्हणून संस्थाचे जाळे तयार करणे सोडूनच द्या, साध्या धड अवस्थेतील प्राथमिक शाळाही या विभागांमध्ये नसतात. आदिवासींच्या विकासासाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पी तरतूद केली जाते. मात्र, अनेकदा यातील निधी दुसरीकडेच वळवला जातो. शासनसंस्थेला घाबरणा-या 'या गरीब वर्गातून तिला जाब विचारणारेही कुणी नसते. त्यामुळे, सरकारी पातळीवर आंधळ दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय' अशीच अवस्था याबाबत दिसते. दुसरीकडे आदिवासींच्या हक्कांसाठी लढणा-या सामाजिक संघटना या त्यांच्या अधिकारांसाठी कायम संघर्षशील राहतात. मात्र, अशा पद्धतीच्या सकारात्मक कामात या संघटनांना रस असल्याचे आजवर बिलकुलच दिसत नाही. आदिवासींची संस्कृती ही परिपूर्ण असून त्यांना शहरीकरणांची अजिबात हवा लागू नये, इतक्या टोकाची भूमिका मुंबई-पुण्यातून समाजसेवेची पदवी घेऊन गेलेल्या ब-याच तरूण कार्यकर्त्यांची असते.

सरकार व आदिवासींमध्ये काम करणा-या सरकारी संस्था या दोन्हींकडून आदिवासींच्या शैक्षणिक प्रश्नाकडे जाणते-अजाणतेपणी केल्या जाणा-या दुर्लक्षापोटीच राखीव जागा लाटण्याचे घोटाळे होतात. सरकारी नोकरीसाठी वाट्टेल त्या स्तराला जाणारे तरूण पैसे देऊन खोटी जात प्रमाणपत्रे बनवून आदिवासींच्या रिकाम्या राहणा-या राखीव जागा बळकावतात. आता जातपडताळणीच्या अटी इतक्या कठोर करण्यात आल्या आहेत की, शेवटी हा प्रकार कुठे ना कुठे उघडकीस येतोच. मात्र असा प्रकार उघडकीस आल्यावर त्यांना न्यायालयात आव्हाने दिली जातात. प्रकरणे प्रलंबित राहतात. दरम्यान अनेकदा अशा कर्मचा-यांची संख्या इतकी मोठी होऊन बसते की, त्यांच्यावर

KARVY'S INSTITUTE

कारवाई करण्याऐवजी त्यांना माफ करून सेवेत समाविष्ट करून घेण्याबाबतही सरकार घोषणा करून बसते. समाजातील शेवटच्या स्तरापर्यंत विकास पोहोचविण्याचे काम प्रामुख्याने प्रशासकीय अधिकारीच करीत असतात. प्रशासनातील शिरकावच जर अशा खोटया मार्गाने होणार असेल तर प्रगतीचे सर्व दरवाजे बंद झालेला, समाजातील पिचलेल्या या घटकाचा लोकशाहीवरील विश्वास उडून तो हिंसक मार्गाकडे आकर्षित होण्याची भीती आहे. म्हणूनच अशी घटना देशभरात सर्वत्र होणा-या भ्रष्टाचारातील एक म्हणून सोडून न देता संबंधितांवर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे.

**5. आदिवासी तरूणांना शासकीय नौकरी मिळविणे दिवास्वप्तासारखे का असते ?**

(1) अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत राहून नौकरी मिळविल्यामुळे.
(2) अमाप प्रमाणात शासकीय पदभरतीमध्ये भ्रष्टाचार असल्यामुळे.
(3) शासकीय पदांच्या परीक्षा अत्यंत कठीण असल्यामुळे.
(4) क्वचितच आदिवासी तरूण शासकीय नौक-या मिळवितात

---

**6. परिच्छेदाच्या अनुषंगाने 'आंधळ दळतयं' आणि 'कुत्रा पीठ खातंय' या म्हणीचा अर्थ काय ?**

(1) दुर्बळ घटकांची पिळवणूक करून सबळांचा फायदा.
(2) शासकीय भोंगळ कारभारामुळे अराजकता
(3) शासकीय कामकाजामध्ये निरस्थेचे वातावरण
(4) विकासाच्या नावावर पैशांची उधळपटटी

---

**7. आदिवासी समाजाबाबत समाजामध्ये कसा दृष्टीकोन आहे ?**

(1) आदिवासींना सुसंस्कृत करून त्यांना शासकिय पदे प्राप्त करून देणे.
(2) आदिवासींना त्यांच्याच वातावरणात ठेवणे.
(3) आदिवासींना आरक्षणांच्या सवलती पूरवून त्यांचा आर्थिक विकास करणे.
(4) आदिवासींचे आधुनिकीकरण करणे.

---

**8. लेखकाच्या मते आदिवासींचा विकास का होत नाही ?**

**(a)** शैक्षणिक संरचनेची दुरावस्था **(b)** सामाजिक संघटनांचा नकारात्मक दृष्टिकोन **(c)** फोफावलेला भ्रष्टाचार

(1) केवळ a  (2) केवळ a व b  (3) केवळ a व c  (4) वरील सर्व

---

**9. लेखक परिच्छेदाच्या माध्यमातून कोणती अपेक्षा करीत आहे ?**

**(a)** आदिवासींचा स्वयंबळावर विकास
**(b)** समाजातील विकसित घटकाकडून आदिवासींना मदत
**(c)** सुदृढ आणि तत्पर न्यायव्यवस्था

(1) केवळ a  (2) केवळ a व b  (3) केवळ b व c  (4) वरील सर्व

---

KARVY'S INSTITUTE

**परिच्छेद 3**

मानव हा अनुकरणशील व प्रयोगशील प्राणी आहे. अनुकरणाला विवेकाची जोड लाभली तर माणूस यशाकडे झेपावतो. अभ्यासपूर्वक काही गुणांची दखल घेऊन केलेले अनुकरण लाभदायक होते. अंधानुकरण माणसाला विनाशाकडे नेते. आपल्या मर्यादा व क्षमता याचा विचार न करता एखाद्याचे अनुकरण केले तर किती अनर्थ होतो पाहा. एका नदीच्या काठावर तीन साधू ध्यान करीत बसले होते. चौथा नवखा साधू त्यात सामील झाला. काही अंतरावर बसला. थोडया वेळाने जुन्या तीनपैकी एक उठला. नदीला नमस्कार केला, अन् चक्क पाण्यावरून चालत पलीकडे गेला. परत मूळ जागेवर आला. दोन्ही साधूंनी तसेच केले. पुन्हा ते ध्यानस्थ बसले. या नवख्या साधूने तिघांचे अनुकरण केले. नदीला नमस्कार करून पाण्यावरून चालण्याचा प्रयत्न केला आणि बघता बघता तो वाहून गेला. त्याच्याकडे पाहात तिघांपैकी एक म्हणाला, 'अरेरे, आपण त्याला पाण्याखालचा दगडी रस्ता सांगायला हवा होता अन् त्यानेही आपल्याला विचारून पाऊल टाकायला हवे होते.'

सदर प्रसंग वाचताना असे वाटते की, दैवी सामर्थ्यांमुळे ते तीन साधू पाण्यावरून चालत असावेत. वस्तुस्थिती तशी नव्हती. वाहत्या पाण्यामुळे दगडी रस्ता दिसत नव्हता, पण त्यांना तो माहीत होता. जीवनाची वाटचाल करताना अनेकदा आपणास पाण्याखालचे दगडी रस्ते माहीत नसतात. अनोळखी क्षेत्रात पाऊल टाकताना जाणत्या माणसाकडून ते ज्ञात करून घ्यावे लागतात. ज्ञानदेव म्हणतात.

**एथ वडील जे जे करिती |**
**तया नाम धर्मु ठेवती |**
**तेचि येर अनुष्ठिती | सामान्य सकल ||**

वडील याचा अर्थ थोर माणसे, ती जे आचरण वा कर्म करतात, त्याचे अनुकरण सामान्य लोक करतात व त्यालाच धर्म मानतात. सध्या धर्माच्या मार्गावर स्वार्थ साधणा-यांचा सुळसुळाट झाला आहे. शांतपणे जीवन जगू इच्छिणा-यांच्या अवतीभवती घडणा-या भयानक घटनांनी लोक चक्रावले आहेत. धर्म व संस्कृतीच्या नावाखाली अंधश्रद्धा बळकट होत आहेत. सत्ता, संपत्ती व संततीसाठी निष्पाप जीवांचे बळी पडत आहेत. धर्म, जात, संप्रदायांच्या भिंती उभ्या करून समाज एकसंघ राहणार आहे का ? आपण हे लक्षात घेतले पाहिजे. जसे देश अनेक, पण विश्व एक आहे. तसेच, धर्म अनेक असले तरी उद्दिष्ट एकच आहे. 'जगाला प्रेम अर्पावे.' परस्पर विश्वास व प्रेम यांच्या समन्वयातून संस्कृतीचे सौंदर्य वाढते. 'जे आपणासी ठावे, ते इतरांसी शिकवावे' हे समर्थ सूत्र ज्ञानोपासकांनी जपले तर अनेकांना पाण्याखालचे दगडी रस्ते समजतील व संभाव्य हानी टळेल.

अज्ञान, अंधश्रद्धेच्या अंधारात रस्ता चुकलेल्यांना मानवधर्माच्या प्रकाशवाटेवर आणण्यासाठी महात्मा फुले यांनी 'तृतीयरत्न' हे नाटक लिहिले. भोळीभाबडी अज्ञानी माणसे बुवाबाजीला फसतात. त्यांना ग्रहता-यांची भीती घालून लुटले जाते. अशाच बुवाचे सोंग व स्वार्थ फुले यांनी उघड करून एका अशिक्षित कुटूंबाला रात्रीच्या शाळेचा मार्ग

KARVY'S INSTITUTE

दाखविला व त्यांचे ज्ञानप्रकाशाशी नाते जोडले. अशा मानवतावादी कर्मामध्ये खरा धर्म सामावलेला असतो. ज्ञानदेव अज्ञानी माणसाला शहाणे करण्याची जबाबदारी शहाण्या माणसाला घ्यायला लावतात. मिळवायचे ते मिळवले, म्हणून शहाणा माणूस निरिच्छ वा निष्क्रिय झाला तर सामाजिक आंधळेपण वाढेलच शिवाय धार्मिक उत्माद माजविणा-यांना चारी वाटा मोकळया होतील. यासाठी ज्ञानदेव कळकळीने सांगतात,

**मार्गी अंधार सरिसा |**
**पुढे देखणाही चाले जैसा**
**अज्ञाना एकटावा धर्मु तैसा |**

एखादा डोळस माणूस, अंधाला आधार देत रस्त्याने पुढे नेतो, त्याप्रमाणे शहाण्या माणसाने, वृत्तिअंधांना स्वत:च्या आचरणातून खरा धर्ममार्ग सांगावा. थोडक्यात स्वत:ला अवगत असणारा पाण्याखालचा रस्ता सर्वांना दाखवावा.

**10. लेखक परिच्छेदाच्या माध्यमातून व्यक्तीस कशाप्रकारचे जगावयास सुचवितो ?**

**(1)** वडीलधा-यांच्या पावलावर पाऊल ठेवण्यास
**(2)** सद्विवेळबुध्दी वापरून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेण्यास
**(3)** इतरांचे कार्य पाहून त्याचे अनुकरण करण्यास
**(4)** अनोळखी क्षेत्रापासून अलिप्त रहाण्यास

---

**11. अंधानुकरणामुळे लेखकाच्या मते काय परिणाम होतात ?**

**(a)** मनुष्याचा विनाश होतो.
**(b)** जगात थोर व्यक्ती निर्माण होत नाहीत.
**(c)** बुवाबाजी लयास जाऊ शकते.

**(1)** केवळ a **(2)** केवळ a व b **(3)** केवळ b व c **(4)** वरील सर्व

---

**12. खालील विधाने लक्षात घ्या -**

**(a)** धर्म ही बाब अनुकरनिय आहे. **(b)** धर्माचे अंधानुकरनामुळे अंधश्रध्दा फोपावते.

**परिच्छेदाच्या दृष्टिकोनातून अचुक पर्यायी उत्तरे शोधा.**

**(1)** विधान a अचुक आहे. **(2)** विधान b अचुक आहे.
**(3)** दोन्ही विधाने अचुक आहेत. **(4)** दोन्ही विधाने अचुक नाहीत.

---

**13. लेखक परिच्छेदाच्या माध्यमातून काय सुचवितो ?**

**(1)** सत्कर्म मार्गदाता बना **(2)** प्रेमाचे आदान-प्रदान करा.
**(3)** सर्व धर्मांना आपले मानून आचरण करा. **(4)** स्वत:च्या चुका दुस-यांना निर्विकारपणे सांगा.

---



KARVY'S INSTITUTE

**14. A आणि B यांचे एकुण उत्पन्न C आणि D च्या एकुण उत्पनापेक्षा ज्यास्त आहे. A आणि C चे एकुण उत्पन्न B आणि D च्या एकुण उत्पन्नाच्या निम्मे आहे. तर सगळयात ज्यास्त उत्पन्न कोणाचे आहे?**

**(1)** A **(2)** B **(3)** C **(4)** D

---

**15. दोन ट्रेन एकाच वेळी हैद्राबाद आणि दिल्लीवरून एकमेकांकडे यायला निघतात. त्यांचा वेग अनुक्रमे 80 kmph आणि 95 kmph इतका आहे. जेव्हा त्या एकमेकांना मिळाल्या तेव्हा असे लक्षात आले कि एका ट्रेनने दुसरीपेक्षा 180 km ज्यास्तीचे अंतर पार केले आहे. तर दोन शहरांमधील अंतर किती ?**

**(1)** 2100 km. **(2)** 2130 km. **(3)** 2200 km. **(4)** 2220 km.

---

**16. A आणि B ने एक व्यवसाय अनुक्रमे 50 आणि 45 रूपयाची गुंतवणूक करून सुरू केला. 4 महिन्यांनतर A ने आपली अर्धी गुंतवणूक परत घेतली तसेच 6 महिन्यांनतर B ने आपली अर्धी गुंतवणूक परत घेतली. C ने तेव्हा व्यवसायात 70 रूपयाची गुंतवणूक करून प्रवेश केला. तर वर्षाच्या शेवटी मिळणारा नफा कोणत्या गुणोत्तरात A, B आणि C यांच्यामध्ये वाटला जाईल ?**

**(1)** 81 : 80 : 84 **(2)** 84 : 80 : 81 **(3)** 80 : 81 : 84 **(4)** 84 : 81 : 80

---

**17. विधाने :** M > H ≤ Y ≤ R < U = Z ≥ E

**निष्कर्ष :** (I) M > R (II) Z ≤ R (III) R > E

**(1)** फक्त निष्कर्ष I आणि II योग्य आहेत.

**(2)** फक्त निष्कर्ष I आणि III योग्य आहेत.

**(3)** कोणताही निष्कर्ष योग्य नाही.

**(4)** फक्त निष्कर्ष II आणि III योग्य आहेत.

---

**परिच्छेद 4**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व्हिस्कोज या पहिल्या मानवनिर्मित तंतूचा शोध लागला.त्यानंतर व्हिस्कोजनंतर अनेक पुनर्जनित तंतू विकसित झाले. हे पहिल्या पिढीतील मानवनिर्मित तंतू होत. इ.स. १९३५ साली नायलॉन या संश्लेषित तंतूच्या निर्मितीपासून दुस-या पिढीतील तंतूंच्या निर्मितीस प्रारंभ झाला, त्यानंतर पॉलिस्टर, ॲक्रिलिक, पॉलीप्रॉपिलिन, असे अनेक तंतू उदयांस आले. या वेळेपर्यंत नैसर्गिक तंतूंचे पर्यायी तंतू अशीच मानवनिर्मित तंतूंची ओळख होती. परंतु गेल्या पाव शतकात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील प्रगतीने वस्त्रोद्योगापुढे नवी नवी आव्हाने उभी केली. या आव्हानांची पूर्ती करणे हे नैसर्गिक व पहिल्या व दुस-या पिढीतील मानवनिर्मित तंतूंच्या आवाक्याबाहेरचे होते. त्यामुळे विशिष्ट उपयोग डोळयासमोर ठेवून त्याला लागणारे गुणधर्म असणारे तंतू निर्माण करावेत असा विचार शास्त्रज्ञांनी केला. अमेरिका, युरोप आणि आशिया खंडातील प्रगत देशांमध्ये यासंबंधीच्या संशोधनांनी जोर धरला. आणि त्यातूनच मानवनिर्मित तंतूंच्या तिस-या पिढीचा विकास

KARVY'S INSTITUTE

झाला. या तंतूंना उच्च कार्यक्षमता तंतू किंवा उच्चतंतू असे संबोधले जाते. सर्वसामान्यांच्या गरजांशी या तंतूंचा फारसा संबंध येत नाही त्यामुळे त्यांचे उत्पादन मर्यादित प्रमाणातच केले जाते. मात्र त्या त्या क्षेत्रात हे तंतू फार मोलाची कामगिरी बजावीत आहेत.

उच्च कार्यक्षमता या नावाप्रमाणेच या तंतूमध्ये ताकद, लंबन क्षमता, स्थितिस्थापकत्व, उष्णतारोधकता, ज्वलनरोधकता, विशिष्ट रासायनिक द्रव्यांना रोधकता यासारखे गुणधर्म अतिशय उच्च कोटीचे असतात.

उच्च कार्यक्षमता तंतू या वर्गात अनेक तंतू येतात आणि प्रत्येकाचे कार्यक्षेत्र वेगळे असते. त्यांच्या संभाव्य उपयोगाप्रमाणे अतिशय उच्च कोटीची तन्यता, उष्णतारोधकता, विद्युतरोधकता, रसायनरोधकता इत्यादी गुणांची आवश्यकता असते. या विविध गरजा पूर्ण करणारे वेगवेगळे तंतू विकसित करण्यात आले आहेत. या तंतूच्या विविध प्रकारच्या गुणधर्मांमुळे या तंतूंचा वापर जमिनीची धूप थांबवणा-या भूवस्त्रांपासून, संरक्षण, क्रीडा, उद्योग अशा अनेक क्षेत्रांमध्ये केला जात आहे. म्हणूनच एका दृष्टीने पाहिले असता हे सर्व असामान्य तंतू आहेत.

**18. खालीलपैकी अचुक विधाने कोणती ?**

**(a)** मानवनिर्मित तंतू हे नैसर्गिक तंतू पासून तयार केले जातात

**(b)** नैसर्गिक तंतूपासून केवळ वस्त्रनिर्मितीच होते.

**(c)** मानवनिर्मित तंतूमधील गुणधर्म नैसर्गिक तंतूपेक्षा वेगळे असतात.

**(1)** केवळ a  **(2)** केवळ a व b  **(3)** केवळ c  **(4)** केवळ a व c

---

**19. तीस-या पीढीतील मानवनिर्मित तंतू मध्ये खालीलपैकी कोणते गुणधर्म आहेत ?**

**(a)** अविद्राव्यता  **(b)** निर्विकारता  **(c)** तन्यता

**(1)** केवळ a  **(2)** केवळ a व b  **(3)** केवळ b व c  **(4)** वरील सर्व

---

**20. खालील विधाने लक्षात घ्या -**

**(a)** तीस-या पीढीतील मानवनिर्मित तंतू हे विशेषीकरणात्मक आहेत.

**(b)** तीस-या पीढीतील मानवनिर्मित तंतू यांचे मर्यादित प्रमाणात उत्पादन होत होते.

**परिच्छेदाच्या दृष्टीकोनातून अचुक पर्यायी उत्तरे शोधा.**

**(1)** केवळ विधान a अचुक आहे.  **(2)** केवळ विधान b अचुक आहे.

**(3)** दोन्ही विधाने अचुक आहेत.  **(4)** दोन्ही विधाने अचुक नाहीत.

---

## परिच्छेद 5

एप्रिल २०१५ अखेर महागाईच्या दराने नवा नीचांक गाठल्याने औद्योगिक संघटनांनी पुन्हा रिझर्व्ह बॅंकेकडे व्याजदर कपातीचा आग्रह धरला आहे. देशातील गुंतवणुकीत मोठया प्रमाणात भर पडावी तसेच, आर्थिक विकासाचा दर वाढावा यासाठी व्याजदरात घट करण्याची आवश्यकता आहे. सध्या महागाई रसातळाला गेल्याने

KARVY'S INSTITUTE

व्याज दर घटविण्यात काहीच अडथळा नसल्याचे मत विविध औद्योगिक संघटनांनी व्यक्त केले आहे.

'कमोडिटी बाजारातील वस्तूंचे घटलेले दर आणि केंद्र सरकारने महागाई घटविण्यासाठी केलेल्या उपाययोजना या पार्श्वभूमीवर महागाई बरीचशी नियंत्रणात आली आहे. त्यामुळे ही सर्व परिस्थिती पाहता व्याजदर घटविण्याची हीच योग्य वेळ आहे. त्यामुळे आगामी पतधोरण जाहीर करताना त्यात व्याजदर कमी करण्याची अपेक्षा उद्योग बाळगून आहेत', अशी प्रतिक्रीया 'कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज'चे (सीआयआय) महासंचालक चंद्रजीत बॅनर्जी यांनी व्यक्त केली. एप्रिल २०१५ अखेर महागाईचा दर उणे २.६५ टक्क्यांवर गेला आहे. गेल्या सहा महिन्यांतील हा सर्वात नीचांकी दर ठरला आहे. मुख्यत्वे करून इंधनाचे आणि उत्पादीत वस्तूंचे दर घसरल्याने महागाई घसरली आहे. मात्र अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे देशातील
लाखो हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याने अन्नधान्य महागले आहे.

'महागाईच्या दरात घट झाल्याने व्याजदर आणखी कमी करण्याची रिझर्व्ह बॅंकेला आयती संधीच चालून आली आहे. त्यामुळे आगामी द्वैमासिक पतधोरण आढाव्यात व्याजदर कमी होण्यास काहीच हरकत नाही. सर्वकाही आलबेल असल्याने महागाईचे दर वाढण्याचीही सुतराम शक्यता नाही. व्याजदरात घट झाल्यामुळे देशातील उद्योगांचा फायदा होणार आहे,' असे मत उद्योगाची शिखर संघटना असणा-या 'असोचेम'चे अध्यक्ष राणा कपूर यांनी व्यक्त केले.

या पूर्वी ७ एप्रिल २०१५ रोजी सादर करण्यात आलेल्या पतधोरण आढाव्यात रिझर्व्ह बॅंकेने व्याजदर 'जैसे थे' ठेवले होते.

चालू वर्षात रिझर्व्ह बॅंकेचे गव्हर्नर डॉ.रघुराम राजन यांनी आश्चर्यकारकरीत्या दोन पतधोरण आढाव्यामध्ये प्रमुख व्याजदरांमध्ये प्रत्येकी पाव टक्क्यांची घट करण्याची शिफारस केली होती. या पार्श्वभूमीवर बॅंकांनी घटलेल्या व्याजदराचा फायदा सर्वसामान्य ग्राहकांना करून देण्याचेही त्यांनी बजावले होते. नोव्हेंबर २०१४ पासून घाऊक किंमत निर्देशांक सातत्याने उणे अंकांवर येत असल्याचे दिसून आले आहे. एप्रिल २०१४ मध्ये हा निर्देशांक ५.५५ टक्के होता.

**21. खालीलपैकी अचुक विधाने कोणती ?**

**(a)** व्याजदर आणि महागाई या एकमेकांस प्रत्यक्षात परिणाम करतात.
**(b)** महागाई घसरली की केंद्र सरकार त्यास वाढविण्याचे प्रयत्न करते.
**(c)** महागाईतील घट उद्योगक्षेत्रास फायदेशीर असते.

**(1)** केवळ a  **(2)** केवळ a व b  **(3)** केवळ b व c  **(4)** वरील सर्व

KARVY'S INSTITUTE

**22. व्याजदरातील कपात करण्याकरीता खालीलपैकी कोणत्या बाबी पोषक वातावरण तयार करतांना दिसतात?**

**(a)** इंधन आणि उत्पादित वस्तुंचे भाव घसरले.

**(b)** अवकाळी पावसामुळे अन्नधान्य महागले.

**(c)** रिझर्व्ह बॅंकेच्या गव्हर्नरने अशी घोषणा केल्याने.

**(1)** केवळ a **(2)** केवळ a व b **(3)** केवळ a व c **(4)** केवळ c

---

**23. परिच्छेदाचे आकलनाअंती काय निदर्शनास येते ?**

**(1)** उद्योजक नेहमीच व्याजकपातीची मागणी करतात.

**(2)** रिझर्व्ह बॅंक व्याजदर धोरणामध्ये कृषी क्षेत्राचा विचार करीत नाही.

**(3)** पतधोरण अत्यंत संवेदनशील बाब आहे.

**(4)** महागाईतील घटीचा कृषी क्षेत्रातील महागाईशी संबंध नसतो.

---

**परिच्छेद 6**

दुर्जन कोणाला म्हणावे असे विचारले तर याकूब मेमन, दाऊद इब्राहिम, छोटा राजन अशी नावे तत्क्षणी व नि:शंकपणे सांगितली जातात, पण सज्जन कोणाला म्हणावे असे विचारले तर ? लगेच उत्तर येणार नाही. थोडे आठवून प्रत्येक जण त्याच्या माहितीप्रमाणे सिंधुताई सपकाळ, प्रकाश आमटे, अभय बंग अशांची नावे सांगेल. दुर्जनांची नावे तोंडावर आणि सज्जनांची नावे विचार करून आठवावी लागतात. मानवजातीची संस्कृती इतिहास व पुराणे यांमधून जेवढी व जेव्हापासून कळत आली, तेव्हापासून 'गुड' व 'बॅड-इव्हिल' अस्तित्वात आहेत. भारतीय परंपरेत त्यांना 'सु' आणि 'कु' अशा अभिधानांनी अधोरेखित केले जाते त्यामुळे आपल्याकडे वस्तुनिष्ठता लोपते व अतिशयोक्ती बहरते. त्याचा परिणाम म्हणून अतिरेकास भारतीय उपखंडात सुपीक (पुन्हा सु आलाच!) भूमी सापडली. तो मुद्दा वेगळा. पण 'सु' व 'कु' ज्या व्यवस्थेतून निर्माण झाले, ती व्यवस्था कोणती ? मनुष्यमात्राचा स्वभाव घडतो तो कशातून ? ती जन्मजात असतो, की परिस्थितीने घडतो ? या चर्चा अनंत काळ चालू आहेत. एक वैशिष्ट्य नमूद केले पाहिजे, की स्वभावाला वळण लावण्याचे संस्कार नावाचे साधन भारतात प्रभावी मानले गेले आहे. तसे ते अन्य संस्कृतीत प्रकर्षाने मांडले जात नाही व जाणवतही नाही.

'व्हॉट्स ॲप' वर निर्विवाद वाटावा असा 'सु'विचार प्रसूत होत आहे. त्यात म्हटले आहे, की रामराज्यात कैकयी आहे आणि रावणराज्यात विभीषण आहे, हे कसे ? दोघे अनुक्रमे 'बॅड' आणि 'गुड' आहेत. ना रावणाला विभीषणास बिघडवता आले वा रामाला कैकयीस सुधारता आले! तेव्हा स्वभावाला औषध नाही हे खरे.

मग, छगन भुजबळ कायद्यानुसार गुन्हेगारीच्या जाळयात अडकले. त्यांचा गेल्या चार दशकांतील व्यक्तिगत उत्कर्ष, त्यांनी उभे केलेले शैक्षणिक व सामाजिक कार्य, विशेषत: त्यांनी ओबीसी वर्गास दिलेले बळ हे खरे मानायचे की त्यांच्यावर केले जाणारे आरोप? त्यांना सज्जन मानायचे की दुर्जन ? आणि त्यांचे नेते शरद पवार यांचे चातुर्य



KARVY'S INSTITUTE

असे सांगतात, की ते कायद्याच्या चौकटीत कधी येणार नाहीत, इतके निष्कलंक त्यांचे कार्य आहे. पण त्यांच्या बाबतीतही 'व्हॉट्स ॲप' वर सतत चुटके येत असतात. एकात म्हटले आहे, की बिर्ला गौरवाने सांगतात माझे स्वीस बॅंकेत दोन अब्ज डॉलर आहेत, त्यावर अंबानी म्हणतात, आमचे चार अब्ज डॉलर तेथे ठेवले आहेत. पवार मिश्किलपणे स्वत:शी उद्‌गारतात, ती बॅंक माझी आहे ! हा संशय कसा निर्माण होतो? वसुंधरा राजे, सुषमा स्वराज यांनी ललित मोदी संदर्भात त्यापुढे मजल मारली व त्यामुळे भाजपच्या शुद्धाचाराच्या वल्गना फोल झाल्या. भारतात सार्वजनिक क्षेत्रात अशी एकही व्यक्ती नसावी, की जी प्रत्येकाच्या मनातील सज्जन-दुर्जन यांच्या व्याख्येनुसार आदर्श असेल! गंमत अशी, की पुढारी-कलावंत संशयाच्या भोव-यात अडकतो तो दैनंदिन व्यवहारातून ते व्यवहार असतात सामान्य जनांसाठी, सामान्य जनांनी मागितलेले वा नाकारलेले. जेव्हा संशयाच्या जाळयात असल्याचे बोट करून ते कोणाकडे दाखवले जाते तेव्हा दाखवणा-याची चार बोटे स्वत:कडे रोखलेली असतात हा लोकप्रिय संवाद ध्यानी असलेला बरा. लोकशाहीत सर्व घडवणारी-बिघडवणारी जनता हीच असते.

जगात सज्जन-दुर्जन असे काही नसते. मनुष्य काळा-पांढरा नसतो, तो 'ग्रे' असतो व त्या त्या परिस्थितीत तो घडतो-बिघडतो, हे आजचे विचारसूत्र महत्वाचे, व्यक्तीच्या स्वत:च्या मनाचा कौल सर्वश्रेष्ठ होय. त्याकरता मन प्रथम पूर्वग्रहविरहित केले पाहिजे. तीच मनाची निर्गुण शक्ती !

**24. लेखक मनुष्याबाबत कोणता गुणधर्म मांडतो ?**

(1) मनुष्य हा नेहमीच संशयित वृत्तीत वावरतो.
(2) मनुष्य बहुतांशी पुर्वगृहदुषित दृष्टिकोनातून विश्व बघतो.
(3) मनुष्य सातत्याने स्वत:ची प्रतिमा जोपासत असतो.
(4) मनुष्याचा स्वभाव हा स्थितीज नसतो.

---

**25. खालील अचुक विधाने कोणती ?**

(a) मानवसमाजात सतकृत्यापेक्षा कुकृत्ये अधिक प्रमाणात आहेत.
(b) मानवास कुकर्मे लवकर आठवतात परंतु सत्कर्म लवकर आठवत नाहीत.
(c) मनुष्याचा सर्वस्वी स्वभाव हा परिस्थितीवर अवलंबून नसतो.

(1) केवळ a (2) केवळ a व b (3) केवळ c (4) केवळ b व c

---

**26. खालीलपैकी अचुक विधान कोणते ?**

(1) केवळ भारतात संस्कारांमुळे मानवाला उत्तम वळण लागते
(2) स्वभाव ही न बदलणारी बाब आहे
(3) लोकशाहीत पुढारी दुर्बल आणि जनता सबळ असते.
(4) भारतात बहुतांशी लोकप्रिय पुढारी दुर्जन आहेत.

---

KARVY'S INSTITUTE

**27. परिच्छेदाच्या आकलनातून काय स्पष्ट होते ?**

**(1)** मनुष्याचे आयुष्य हे सातत्याने गतीशील असते म्हणून त्याने सजग रहावे.

**(2)** मनुष्याचे चरित्र परिस्थिजन्य असल्यामुळे मनुष्याने परिस्थितीचा विचार करावा.

**(3)** मानवीय जीवनात इतकी क्लिष्टता आहे की त्यामुळे प्रत्येक जणामध्ये दुर्जणाचा अंश आढळतोच.

**(4)** मानवाने जीवन जगतांना जगाकडे उगाच लक्ष देऊ नये.

---

**परिच्छेद 7**

सर्व धर्मामधील आत्मा (अमर) आहे एवढे मात्र खरे. परंतु त्याचे कारण हे आहे की मुळात आत्मा ही 'कल्पना' रचली गेली ती त्याच्या अमरत्वासाठीच होय. आपले शरीर तर मर्त्य आहे. 'मृत्यू' या अटळ व दारूण वास्तवावर उपाय म्हणून तर आत्मा ही कल्पना अस्तित्वात आली. जनजीवनातील अगणित अन्याय, अपार दु:ख व अत्याचार यांचे सर्वमान्य स्पष्टीकरण देता येत नसल्यामुळे, सर्वच माणसांना त्यांच्या चांगल्या-वाईट कर्मांची फळे भोगण्यासाठी, मृत्युनंतर दुसरे महत्वपूर्ण जीवन असणे आवश्यक होते. मग ते स्वर्गनरकात असो की आपल्या पुनर्जन्मात असो. त्यासाठी शरीराच्या मृत्यूने मरत नाही असे काही तरी शरीरात असणे आवश्यक होते व त्यासाठीच आत्मा आलेला आहे व म्हणूनच सर्व धर्मांनी तो अमर आहे असे सांगितले.

सजीवांच्या प्राणाचे-जीवित्वाचे कोडे आज 'संपूर्ण' उलगडलेले आहे, असा दावा विज्ञानसुध्दा करीत नाही. परंतु जीवशास्त्र आपल्याला सांगते की माणसाचा जीव हा शरीरातील कुठल्या एका भागात केंद्रित झालेला नसून तो कोटयवधी पेशीच्या स्वरूपात सर्व शरीरभर पसरलेला असतो. आपला श्वासोच्छ्वास, रक्ताभिसरण इत्यादी प्रक्रियांद्वारे या असंख्य पेशीना ऊर्जापुरवठा होऊन त्या पेशी सजीव बनून राहतात. या सर्व भौतिक रासायनिक क्रिया म्हणजेच सजीवत्व आहे. या सर्व क्रिया बंद होऊन ऊर्जापुरवठा थांबेल, तेव्हा पेशींचे कार्यही थांबेल आणि आपली प्राणज्योत मालवेल व आपण मरण पावू. एकदाच आणि कायमचे. दिव्यातील तेल संपल्यावर दिवा विझतो तसे. आधुनिक प्रगत मेंदू विज्ञानानेही आता सिद्ध केलेले आहे की आपल्या मेंदूच्या व मनबुद्धीच्या प्रक्रिया या केवळ मेंदूतील पेशीच्या 'रचना' व त्यांच्या 'भौतिक व रसायनशास्त्रीय नियमांनी' घडतात. तेव्हा आपली जीवनप्रक्रिया आणि मेंदू व मनबुद्धी (म्हणजे जाणिवा, संवेदना, व्यक्तिमत्व वगैरे) यांची कार्ये चालविण्यासाठी आपल्या शरीरात कुणी आत्मा असण्याची व मृत्यूनंतर तो निघून कुठे तरी जाण्याची काही गरज नाही. सारांश- आपल्या शरीरात आत्माबित्मा असे काही नाही, हे कुणाही विचार करणा-या माणसाला पटावे, असे मला वाटते.

आपले 'जिवंत असणे' हा आत्म्याच्या अस्तित्वाचा पुरावा होऊ शकत नाही. मनुष्य आपला 'भौतिक, क्षणभंगुर मर्त्यजीव' आणि त्याने स्वत:चे कल्पिलेला 'अमर आत्मा' यांची गुंफण करून, त्याच्या अल्पायुषी, दु:खमय सजीवतेला तथाकथित शाश्वत आत्म्याचा मानसिक आधार घेत जगत राहतो, एवढेच खरे आहे.

KARVY'S INSTITUTE

**28. खालीलपैकी अचुक विधान कोणते ?**

(1) आत्मा ही धर्मसापेक्ष संकल्पना आहे.

(2) जगातील सर्वच धर्मांनी आत्म्याचे अस्तित्व सांगितले आहे.

(3) हिंदू आणि पारसी या दोन्ही धर्मात एकच गुणधर्म असलेला आत्मा सांगितला आहे.

(4) आत्मा ईश्वरप्रेणीत स्वयंप्रकाशित उर्जा आहे.

---

**29. लेखक आत्म्याचे अस्तित्व धर्मामध्ये नमूद असण्याचे काय कारण सांगतो ?**

(1) प्रत्येक धर्माला मानवीय आयुष्यापलीकडील बाबींच्या वेध घ्यावयाचा होता.

(2) धर्माला मानवीय समुदायास सातत्याने कमकुवत बनवायचे होते.

(3) धर्मसंस्थापकांना आपले पद अबादीत राखण्याचे होते.

(4) मानवीय कष्टप्राय जीवन जगण्याकरीता एक प्रकारचा आधार देणे गरजेचे होते.

---

**30. खालीलपैकी अचुक विधान कोणते ?**

(1) विज्ञान जीवसृष्टीच्या सर्व बाबींचे स्पष्टीकरण करते.

(2) धर्मांनी आत्म्याच्या अमरत्वाची संकल्पना मानवीय जीवन सुलभ करण्याकरीता निर्माण केली आहे.

(3) आत्मा ही संकल्पना मृत्युचे अटळत्व वास्तव्य स्वरूपात आणण्याचा प्रयत्न करते.

(4) विज्ञानाची प्रगती आत्म्याचे अस्तित्व नाकारते.

---

**31. धार्मिक दृष्टिकोनातून 'आत्मा' काय आहे ?**

(1) शास्वत परिकल्पना (2) मानवाचे भविष्य

(3) मानवीय जीवनाचे सत्य (4) सामाजिक आधार

---

**32. परिच्छेदाच्या अवलोकनातून काय स्पष्ट होते ?**

(1) सर्व धर्म समान आहेत. (2) मानवीय जीवन नश्वर आहे.

(3) आत्मा ही संकल्पना मानवास आनंद देते. (4) आत्मा मृत्युचे अदृश्य रूप आहे.

---

**33. A, B, C, D, E, F, G आणि H एका वर्तुळाकार टेबलाभोवती मध्याकडे तोंड करून बसले आहेत. B हा H च्या उजवीकडे दुस-या क्रमांकावर आणि A च्या डावीकडे तिस-या क्रमांकावर बसलेला आहे. D हा F च्या उजवीकडे दुस-या क्रमांकावर असुन B किंवा H चा लगतचा शेजारी नाही. C हा G च्या उजवीकडे चौथ्या क्रमांकावर आहे तसेच G आणि H हे लगतचे शेजारी नाहीत. तर खालीलपैकी कोण D चे लगतचे शेजारी आहेत ?**

(1) A आणि C (2) C आणि H (3) F आणि A (4) A आणि B

---

KARVY'S INSTITUTE

**34.** राजाने मरणापुर्वी आपल्या जवळ असलेल्या सोन्यांच तिन प्रमुख राण्यांमध्ये खालील प्रमाणात वाटप केलं. एकुण सोन्यापैकी **50%** सोंन दुस-या राणीला आणि त्यातुन उरलेल्या सोन्यातुन **50%** सोंन तिस-या राणिला दिलं. तिनही राण्यांच एकत्र सोनं मिळून **1,30,900 kg.** होत असल्यास राजाकडे सुरूवातील एकुण किती सोनं होत ?

**(1)** 1,50,000 kg **(2)** 1,49,600 kg **(3)** 1,51,600 kg **(4)** 1,52,600 kg

---

**35.** दिलेल्या दोन्ही समिकरणांची उकल करून योग्य पर्यायाचे उत्तर निवडा.

**I.** $2x^2 - 11x + 15 = 0$

**II.** $2y^2 - 11y + 14 = 0$

**(1)** $X \geq Y$ **(2)** X आणि Y मध्ये निश्‍चित नाते सांगता येत नाही. **(3)** $X > Y$ **(4)** $X < Y$

---

**36.** सहा सदस्य असलेल्या एका घरात **Q** हा **R** चा मुलगा आहे. **T** हा **R** चा भाऊ आहे. **S** ही **P** ची मुलगी आहे. **R** ही **Q** ची आई नाही. **P** आणी **R** हे विवाहीत दाम्पत्य आहे. **U** हा **Q** चा भाऊ आहे. तर घरात महीला सदस्य कोण आहेत ?

**(1)** P आणि S **(2)** Q आणि S **(3)** T आणि U **(4)** P आणि T

---

**37.** शब्द आणि अंकांचे इनपुट दिले असता त्यांची मांडणी करतांना एक मशीन विशिष्ट नियम पाळते. उदा. -

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Input** : | Pound | 31 | Red | 24 | 18 | girl | 29 | elephant |
| **Step I** : | Red | pound | 31 | 24 | 18 | girl | 29 | elephant |
| **Step II** : | Red | girl | pound | 31 | 24 | 18 | 29 | elephant |
| **Step III** : | Red | girl | pound | 24 | 18 | 29 | elephant | 31 |
| **Step IV** : | Red | girl | pound | 24 | 18 | elephant | 31 | 29 |
| **Step V** : | Red | girl | pound | elephant | 24 | 18 | 31 | 29 |
| **Step VI** : | Red | girl | pound | elephant | 18 | 31 | 29 | 24 |
| **Step VII** : | Red | girl | pound | elephant | 31 | 29 | 24 | 18 |

स्टेप **VII** ही इनपुट ची शेवटली स्टेप आहे. याच नियमाला अनुसरून खालील इनपुट दिले आहे.

**business photon 14 27 Ahead the 33 32 said 15 discuss 17**

तर **Step IV** मध्ये डाबीकडुन चौथ्या क्रमांकावर कोणता शब्द/ अंक असेल ?

**(1)** business **(2)** 14 **(3)** photon **(4)** 32

---

KARVY'S INSTITUTE

**परिच्छेद 8**

